**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**वैद्यकीय आरोग्य विभाग**

दि. २५/०४/२०२५

# प्रेसनोट

हज यात्रेला जाण्याकरिता इच्छुक असलेल्या यात्रेकरुसाठी मेनिजायटीस (मेंदु आवखदाह) प्रतिबंधक लस व ओरल पोलिओ व्हॅक्सिन इ. लस घेणे अनिवार्य असल्याने दि.२६/०४/२०२५ पासून महानगरपालिकेच्या सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई (प.) येथे सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत हज यात्रेकरुची आरोग्य तपासणी व लसीकरण मोहिम आयोजित करण्यात येणार आहे.

- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण १७७ यात्रेकरुना शासनाकडून मान्यता मिळालेली असून त्यांची आरोग्य तपासणी व मेनिजायटीस (मेंदु आवखदाह) प्रतिबंधक लस व ओरल पोलिओ व्हॅक्सिन, सिझनल इन्फल्युएंजा व्हॅक्सिन SIV इ. लस देण्यात येणार आहे.
- सदरची लस हज यात्रा सुरु होण्यास किमान २ आठवडे आधी घेणे गरजेचे आहे.
- सिझनल इन्फल्युएंजा व्हॅक्सिन SIV ही लस ६५ वर्षांवरील व Comorbid Conditions such as chronic respiratory diseases, Diabetes, Liver and Kidney Failure असलेल्या यात्रेकरुंना देण्यात येईल.
- मेनिजायटीस (मेंदु आवखदाह) प्रतिबंधक लस व ओरल पोलिओ व्हॅक्सिन व सिझनल इन्फल्युएंजा व्हॅक्सिन SIV ही लस घेण्यासाठी रुग्णालयांत येतान हज यात्रेकरिता देण्यात आलेले पासपोर्ट आयडी व हेल्थकार्ड सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे.

तरी हज यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरुंनी महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या सदर वैद्यकीय सुविधांचा लाभ घ्यावा.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका

Scanned with CamScanner